# प्रकरण-1

# संस्थेची कर्तव्य व कामे याविषयची माहिती

कामगार विभागाची स्थापना कामगार व प्रशासन यांच्यामधिल समन्वय अधिकारी म्हणून करण्यात आलेली आहे. तसेच सर्व खाते प्रमुख यांना कामगार कायदेविषयक व इतर बाबीसंबधी मार्गदर्शन करणे आहे.

अ) खात्याचे कर्तव्ये

1. प्रशासन व कामगार यामध्ये समनवय साधणे.
2. सर्व खाते प्रमुख यांना कामगार कायदे सेवानियम व स्थाही आदेश यांची अंमल बजावधी करण्यासाठी मदत करणे.
3. प्रशासन व कामगार यामध्ये चांगले व सलोख्याचे संबंध ठेवणे.
4. प्रशासनास कामगार कायद्याचे अंमलबजावणी करण्याबाबत मदत व मार्गदर्शन करणे.
5. औद्यागिम शांतता राखण्यासाठी कामगार संध्झटनांशी सलोख्याचे संबंध ठेवणे.
6. चतुर्थश्रेणी कामगांराची भरती आणि विविधा खात्यांना कामगार देण्याची मध्यवर्ती व्यवस्था करणे.
7. महानगरपालिकेमधील कर्मचाऱ्यांच्या कल्याणबाबत देखभाल करणे.
8. घन कचरा व्यवस्थापन खाते व मालमत्ता खाते वगळून अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यासाठी छाननी करणे.

ब) कामे

1. कामगार प्रवर्ग व प्रशासन यामध्ये समन्वय अधिकारी म्हणून काम करणे.
2. खाते प्रमुख यांना कामगार कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत मदत व सल्ला देणे.
3. कामगार न्यायालय/औद्यागिक न्यायालय व समेट अधिकारी यांच्याकडील प्रकरणे निकालात काढण्यासाठी हजर राहणे.
4. प्रशासन व कामगार यांच्याबरोबर चांगले सबंध ठेवून कामगाराची कार्यक्षमता वाढवणे व प्रशासनाचा कारभार सुलभरीतीने चालण्यासाठी मदत करणे.
5. प्रशासन व कामगार यांच्यामधील विवाद मिटवण्यासाठी औद्योगिक संबंध ठेवणी व विवाद झाल्यास सतत पाठपुरावा करुन करार करण्यासाठी मदत करणे.
6. प्रशासनास कर्मचाऱ्यांना कल्याणकारी सुविधा उदा. कॅन्टीन विश्रांतीची सोय, मुंतारी, पिण्याच्या पाण्याची सोय इत्यदी देण्याबाबत मदत व सल्ला देणे.
7. असंघटीत कामगाराच्या संघटनेसोबत तसेच महानगरपालिकेमधील कार्यकारी अधिकारी यांच्याशी संबंध ठेवणे.
8. संघटनांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत संघटनेच्या परतिनिधीसोबत त्यांच्या मागणीबाबत सल्लामसलत करणे.

9. महानगरपालिकेच्या विविध खात्यामध्ये तसेच कामाच्या ठिकाणी भेटी देऊन कामगारांच्या तक्रारी व तंटयाबाबत पूर्ण व बारकाईने चौकशी करुन तक्रारीचे निराकरण करणे.
10. तक्रार समितीची सभा बोलावून कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक गाऱ्हाणी सोडवणे.
11. महानगरपालिकेच्या वसाहतीमध्ये असलेल्या कामगार कल्याण केंद्रामार्फत कामगारांना कल्याणकारी योजना व त्यांचे फायदे देण्याबाबत कल्याणकारी योजनांचे नियोजन करणे व राबविणेबाबत पर्यवेक्षण करणे.
12. आंतरविभागीय /खात्यांतर्गत नाटयस्पर्धा ,सांस्कृतिक व क्रिडा स्पर्धाचे आयोजन करणे.
13. कल्याण केंद्र व बालवाडी चालविण्याबाबत पर्यवेक्षण करणे.